वर्ष-०९ | अंक-०७ | मुंबई, मंगळवार ०३ ते ०९ जानेवारी - २०२३ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

•संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष नको

3 → आव्हानाआधीचे आव्हान!
घाटकोपर स्थानकात प्रवाशांच्या प्रचंड गर्दीमुळे चेंगराचेंगरीचा धोका ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## मुंबई पोलिसांची मोठी कारवाई !

### OLX वरून कोट्यवधींची फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश



OLX वर खरेदी विक्री करण्याच्या नावाखाली करोडो रुपयांची लुबाडणूक करणाऱ्या आंतरराज्य सायबर गुन्हेगार टोळीचा मुंबई पोलिसांनी पर्दाफाश केलाय. मुंबईच्या सायबर सेलने परराज्यातून या प्रकरणी चार आरोपींना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून 2 लाख रोख रक्कम, 9 मोबाईल फोन, 32 डेबिट कार्ड आणि इतर साहित्य जप्त करण्यात आलंय. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ओएलेक्सवरून फसवणूक झालेल्या काही तक्रारी पोलिसांकडे दाखल झाल्या होत्या. या तक्रारींची दखल घेऊन सायबर सेलने याबाबतचा तपास सुरू केला. त्यासाठी सायबर पोलिसांची काही पथके देखील तयार करण्यात आली. पोलिसांनी मुंबईतील 10 गुन्हे तपासले. त्यातून मिळालेल्या माहितीच्या आधारे मुंबई पोलिसांनी राजस्थान आणि उत्तरप्रदेश येथील चार आरोपींना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या ...पान ३ वर...

## मुंबईत श्रीमंत लोकांना लुबाडायची, विमानाने गोव्याला मित्राकडे वस्तू विकण्यासाठी जायची; पोलिसांकडून बंटी बबलीला अटक

डोंबिवली : फेसबुकवरून श्रीमंत व्यक्तींशी मैत्री करत त्यांना हॉटेलला बोलवून त्यांच्याकडील किमती ऐवज लुबाडणाऱ्या बंटी बबलीला मानपाडा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या दोघांकडून पोलिसांनी 16 मोबाईल, एक रिव्हॉल्वर, दोन जिवंत काडतूस, दोन घड्याळं आणि 290 ग्रॅम सोने असा मुद्देमाल जप्त केला आहे. समृद्धी खडपकर आणि विलेंडर डिकोस्टा अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची




मुंबईमध्ये राहणारी ही महिला श्रीमंत मुलांना लुबाडून मुंबई टू गोवा विमानाचा प्रवास करत आपल्या मित्राकडे चोरीच्या वस्तू विकण्यासाठी देत होती.

नावे आहेत. मुंबईमध्ये राहणारी ही महिला श्रीमंत मुलांना लुबाडून मुंबई टू गोवा विमानाचा प्रवास करत आपल्या मित्राकडे चोरीच्या वस्तू विकण्यासाठी देत होती.

'असा' उघडकीस आला गुन्हा

मानपाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत राहणाऱ्या महेश पाटील यांची फेसबुकच्या माध्यमातून समृद्धी या महिलेशी ओळख झाली. या ओळखीतून या ...पान ३ वर...

## वाशी पोलीसांची कारवाई ; 23 लाख 84 किमतीचे एम्फेटामाईन जप्त, एकाला अटक

नवी मुंबई : नवी मुंबई वाशी येथे 23 लाख 84 हजार रुपये किमतीचा अमली पदार्थ जप्त करण्यात आला असून एका तरुणाला अटक करण्यात आली आहे. या कारवाई दरम्यान 596 ग्रॅम वजनाचा एम्फेटामाईन पोलीसांनी जप्त केला आहे. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी रस्त्यांवर नागरिकांची गर्दी जमलेली असताना वाशी पोलीस ठाणे हद्दीत योग्य तो



बंदोबस्त लावण्यात आलेला होता. या बंदोबस्तादरम्यान रात्री सव्वा नऊच्या सुमारास वाशी प्लाझा ब्रीजच्या पुणे मुंबई मार्गिकेवर स्वच्छता गृहासमोर एक होंडा सिटी गस्त घालणाऱ्या बीट मार्शलमधील पोलीस नाईक मोकळे आणि पोलीस शिपाई गायकवाड यांना दिसली.चालकाची चौकशी : या पांढऱ्या रंगाच्या कारमधील पुरुषाच्या आणि महिलेच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्यांना गाडी बाजूला थांबवण्याचा इशारा केला. गाडी थांबवत असताना...पान ३ वर...

## पिंपरी चिंचवडमधील बेपत्ता झालेल्या वकिलाची हत्या? मृतदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत सापडला

पिंपरी चिंचवडमधील गायब झालेल्या वकिलाची हत्या झाल्याची शक्यता पोलीस तपासात वर्तवली जात आहे. कारण वकील शिवशंकर शिंदे यांचा मृतदेह हा अर्धवट जळालेल्या अवस्थेत महाराष्ट्र तेलंगणा सीमेवरील मदनुर इथे आढळला आहे. नांदेड (Nanded) जिल्ह्यातील पोलिसांनी याप्रकरणी काहींना ताब्यातही घेतलं आहे. वकील शिंदे यांचे ते नातेवाईक असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यांनीच पुरावा नष्ट करण्याचा हेतूने



मृतदेह पेटवला मात्र तो अर्धवटच जळल्याचं समोर येत आहे. पिंपरी चिंचवड पोलीस घटनास्थळी पोहोचत आहेत, त्यांनी संशयित आरोपींना ताब्यात घेतल्यानंतर यामागचं मूळ कारण समोर येणार आहे. वकील शिवशंकर शिंदे कार्यालयातून बेपत्ता वकील शिवशंकर शिंदे 31 डिसेंबर 2022 रोजी त्यांच्या ऑफिसमधून बेपत्ता झाले होते. कुटुंबियांनी त्यांच्याशी संपर्क केला, परंतु तो होऊ शकला नाही. त्यामुळे शिंदे बेपत्ता झाल्याची शंका त्यांच्या मनात आली. यानंतर कुटुंबीय वाकड पोलिसात तक्रार नोंदवण्यासाठी...पान ३ वर...

## वाकडेवाडी एसटी स्थानकात ज्येष्ठ महिलेचे दोन लाखांचे दागिने लंपास



वाकडेवाडी एसटी स्थानकात ज्येष्ठ महिलेकडे बतावणी करुन चोरट्यांनी दोन लाखांचे दागिने असलेली पिशवी लांबविल्याची घटना घडली आहे.

पुणे : वाकडेवाडी एसटी स्थानकात ज्येष्ठ महिलेकडे बतावणी करुन चोरट्यांनी दोन लाखांचे दागिने असलेली पिशवी लांबविल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने खडकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार ज्येष्ठ महिला कोंढवा भागात राहाते. त्या नातेवाईकांच्या विवाह समारंभासाठी नाशिकला गेल्या होत्या. नाशिकहून एसटी बसने त्या मुंबई-पुणे रस्त्यावरील वाकडेवाडी एसटी स्थानकात आल्या.

कोंढव्याला जाण्यासाठी त्या बसची वाट पाहत थांबल्या होत्या. एसटी स्थानकातील बाकावर त्या बसल्या होत्या. त्या वेळी दोन चोरटे तेथे आले. चोरट्यांनी ज्येष्ठ महिलेशी ओळख केली. महिलेला बोलण्यात गुंतवून चोरट्यांनी दोन लाखांचे दागिने, तसेच मोबाइल संच असलेली पिशवी लांबविली. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस फौजदार कांबळे करत आहेत.

## वागळे इस्टेटमधून हद्दपार आरोपीस अटक

ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर या जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेल्या राकेश जाधव (२४) याला ठाणे पोलिसांनी वागळे इस्टेट येथून अटक केली आहे. हद्दपार असतानाही तो वागळे इस्टेटमध्ये वास्तव्य करत होता, अशी माहिती पोलिसांनी दिली. वागळे इस्टेट येथे राहणाऱ्या राकेश जाधव विरोधात विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे ठाणे पोलिसांनी त्याला १६ फेब्रुवारीपासून २०२२ पासून ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर या जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी हद्दपार केले होते.

## औरंगाबाद हादरलं ! एकाच दिवसांत जिल्ह्यात चार मृतदेह आढळून आल्याने खळबळ

नवीन वर्षा चे सर्वत्र आनंदाने स्वागत केले जात असतानाच औरंगाबाद मात्र अनोळखी मृतदेहांच्या घटनांनी हादरलं आहे. कारण एकाच दिवसांत जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी चार मृतदेह आढळून आले आहेत. कन्नड तालुक्यात दोन, गंगापूर तालुक्यात एक आणि वाळूज महानगर परिसरात एक असे एकूण चार मृतदेह एकाच दिवशी आढळून आल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. पहिली घटना कन्नड शहरात समोर आली आहे. शहरातील न्यु हायस्कुल शाळेच्या




पाठीमागे भाऊसाहेब कदम यांच्या ऊसाच्या शेतात कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला आहे. कदम यांच्या शेतात सद्या उसतोड सुरू असून, दुर्गंधी पसरल्याने पाहणी केली असता मृतदेह आढळून आला. त्यानंतर याची माहिती पोलिसांना देण्यात आली. तर माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. हा मृतदेह दहा ते बारा दिवसा अगोदर आणून टाकल्याचा पोलिसांनी अंदाज वर्तवला आहे. दुसरी घटना गंगापूर तालुक्यात समोर आली ...पान ३ वर...

### उपसरपंचपद निवडणूक २ जाने.ला

**नवीन पनवेल :** पनवेल येथील दहा ग्रामपंचायतींच्या उपसरपंचपदाच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला असून, या निवडणुका सोमवार, २ जानेवारी २०२३ रोजी होणार आहेत. पनवेल तालुक्यातील करंजाडे, शिरढोण, शिवकर, चिंध्रन, दिघाटी, कानपोली, केळवणे, नेरे, भाताण, नितळस या ग्रामपंचायतींसाठी १८ डिसेंबर रोजी मतदान झाले. तर, २० डिसेंबर रोजी निकाल लागला. यातून थेट सरपंच निवडण्यात आले. मात्र, उपसरपंच पद हे निवडून आलेल्या सदस्यांमधून निवडले जाणार आहेत. त्यामुळे ज्यांच्याकडे सदस्यांचे बहुमत नाही अशा ग्रामपंचायतीत बहुमत मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. उपसरपंच निवडणुकीत उमेदवारांना समान मते मिळाल्यास निर्णयक मत देण्याचा अधिकार सरपंच यांना असणार आहे.

### डोनेवाडी आदिवासी वाडीला भांडी वाटप

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील वेणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश मुंडे यांनी डोनेवाडी येथील आदिवासी बांधवांनी मागणी केल्याप्रमाणे एक लाखाची भांडी वाटप केली आहेत. गणेश मुंढे हे सामाजिक क्षेत्र तसेच उद्योजक म्हणून कर्जतमध्ये नावलौकिक आहेत. कोरोना काळात त्यांनी मदतीचा हात मोठ्या प्रमाणात दिला. तसेच घराघरात दिवाळी पोहोचवली.

## क्रूरतेचा कळस... डोक्यात संशयाचं भूत, पत्नीसोबतच्या वादात दोन दिवसांच्या बाळालाच बापानं फरशीवर फेकलं

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत निर्दयी बापानं दोन दिवसांच्या बाळाला फरशीवर फेकल्याची धक्कादायक घटना नागपुरात घडली आहे. नागपूर च्या शासकीय रुग्णालयातील घडलेल्या घटनेनं संपूर्ण परिसरात खळबळ माजली आहे. बाळाची प्रकृती गंभीर असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, बाळाला फेकणारा गिरीश हा अमरावती जिल्ह्यातील सावर्डीचा रहिवाशी आहे. याप्रकरणी निर्दयी बापाविरोधात नागपुरातील अजनी पोलीस स्थानकात गुन्हा दाखल




करण्यात आला आहे. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत मारहाण करत गिरीश गोंडाणे या व्यक्तीनं दोन दिवसांपूर्वीच जन्मलेल्या चिमुकल्याला फरशीवर आपटलं. या क्रूर कृत्यामुळं बाळाला गंभीर इजा झाली असून त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गिरीश गोंडाणे असं निर्दयी बापाचं नाव असून तो अमरावती जिल्ह्यातील सावर्डीचा रहवाशी आहे. गिरीश गोंडाणे आणि प्रतीक्षा गोंडाणे हे दोघेही एकाच गावात राहत असून त्यांचा प्रेमविवाह झाला होता. दोघांचा सुखी संसार सुरू होता. पण कालांतरानं दोघांच्या सुखी संसारात संशयाचं भूत शिरलं. त्यानंतर गिरीशनं पत्नीला मारहाण करण्यास सुरू केली. दररोज गिरीश पत्नीवर कोणत्या ना कोणत्या कारणानं संशय घ्यायचा आणि तिला मारहाण करायचा. प्रतीक्षा सगळं काही निमुटपणानं सहन करत होती. काही दिवसांनी प्रतीक्षाला दिवस गेले. अमरावतीहून ...पान ३ वर...

## मुंबई गुन्हे शाखेची मोठी कारवाई!

### 1.22 कोटी रूपयांचं अंमली पदार्थ जप्त, विदेशी महिलेसह निघांना अटक

मुंबई क्राईम गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. अंमली पदार्थ विरोधी घाटकोपर युनिटने 1.22 कोटी रुपये किमतीच्या 610 ग्रॅम मेफेड्रोनसह तिघांना अटक केली आहे. यात एका विदेशी महिलेचा देखील समावेश आहे. हे अंमली पदार्थ 31 डिसेंबर रोजी मुंबई शहरात आयोजित विविध पार्टी पुरवला जाणार होता. A N C अधिकाऱ्यांनी माहितीच्या आधारे प्रथम दोन स्थानिक ड्रग पेडलरला



अटक केल्यानंतर त्यांच्याकडे 150 ग्रॅम मेफेड्रोन सापडले. तपासात त्यांनी हे मेफेड्रोन एका अफ्रिकन वंशाच्या महिलेकडून विरार पूर्व येथून खरेदी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिस ...पान ३ वर...

## डोंबिवलीत ड्रंक आणि ड्राईव्ह करणाऱ्या १८ जणांवर कारवाई



डोंबिवली | कोरोना नंतर दोन वर्षाने नववर्षाचे सेलिब्रेशन मोठ्या प्रमाणावर होणार हे सर्वांनाच अपेक्षित होते .मात्र यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये ,यासाठी डोंबिवली शहरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. शहरात ठिकठीकाणी नाकाबंदी देखील करण्यात आली होती . त्यामुळे डोंबिवलीत सरते वर्ष २०२२ ला निरोप व २०२३ या नववर्षाचे ...पान ३ वर...

## धारावी पुनर्विकासातून नेचर पार्क वगळले; राज्य शासनाची हायकोर्टात माहिती


मुंबईः धारावी पुनर्विकासातून माहिम नेचर पार्क वगळले आहे, अशी माहिती सोमवारी राज्य शासनाने उच्च न्यायालयात दिली. हंगामी मुख्य न्यायाधीश संजय गंगापूरवाला व न्या. संदिप मारणे यांच्या खंडपीठासमोर ही माहिती देण्यात आली. पुनर्विकासाच्या नावाखाली नेचर पार्क उद्धवस्त होता कामा नये. विकास नियोजनात संबंधित भूखंड नेचर पार्कसाठी राखीव असल्याचे नमूद असल्यास त्यावर



अन्य कोणतेही बांधकाम होता कामा नये, असेही न्यायालयाने राज्य शासनाला बजावले आहे. वनशक्ती संघटनेने ही याचिका केली होती. धारावीला लागूनच माहिम नेचर पार्क आहे. नेचर पार्कचा भूखंड ३७ एकरचा आहे. माहिम नेचर पार्क हे जैववैविधेतेचे केंद्र आहे. पार्कमध्ये अनेक वनस्पती व प्राणी आहेत. वन व महसुल विभागाने नेचर पार्कची जागा संरक्षित वन क्षेत्र म्हणून घोषित केली आहे. १६ मार्च १९९१ रोजी तशी अधिसूचना जारी करण्यात आली. राज्य शासनाने २००४ मध्ये धारावीचा पुनर्विकास जाहीर केला. पुनर्विकासाचा पाचवा टप्पा माहिम नेचर पार्कच्या ...पान ३ वर...

# मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष नको

सामाजिक आरोग्य हे व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावरच अवलंबून असते हे तर सर्वश्रुत आहेच. परंतु शारीरिक आरोग्यही बहुतांशी मानसिक स्थितीवर अवलंबून आहे, हे उमजण्याइतपत आपला समाज प्रगल्भ झालेला नाही. म्हणजे सगळ्याचा पाया असलेले मानसिक स्वास्थ्यच जर दुर्लक्षित राहात असेल तर स्वस्थ भारत, सुदृढ भारत कसा निर्माण होईल? मानसोपचार घेणे हे कमीपणाचे, दुबळेपणाचे, शरमेचे आणि एक कलंक (स्टीग्मा) समजला जातो. मानसिक रुग्ण म्हणजे वेडा आणि मानसोपचारतज्ज्ञ म्हणजे वेड्यांचा डॉक्टर ही बुरसटलेली आणि मागासलेली भारतीय विचारसरणी खोडावी लागेल.



अपूर्ण ज्ञानाच्या आधारे मानसिक आजार व उपचाराविषयी नकारात्मक व काहीशी दुर्लक्षित भावना समाजात तयार होणे. ही भावना पूर्वीच्या काळी कुष्ठरोगाबाबतीत अनुभवावयास मिळायची. मानसिक आजार म्हणजे मेंदूतील काही केमिकल्सच्या असमतोलामुळे भावना व विचार प्रक्रियेत येणारा अडथळा होय. उदाहरणार्थ, नैराश्य, उदासीनता, अतिउत्साह, बायपोलार इत्यादी परंतु सगळेच मानसिक रुग्ण मॅनीयाक (ठार वेडे/पागल) किंवा आत्महत्या किंवा इतरास इजा करणारे अशी काहिशी प्रतिमा समाजात तयार झालेली आहे. यात मुख्य वाटा प्रसारमाध्यमांचा आहे.

कारण चित्रपटात मानसिक रुग्णास याप्रकारे दर्शविले जाते व त्याचेच प्रतिबिंब समाजमनावर बिंबते. पण वास्तविकतः अशा गंभीर रुग्णांचे प्रमाण नगण्य असून बहुतांश रुग्ण हे सौम्य लक्षणांचे असतात. मानसोपचाराला कलंक मानणारे दोन वर्ग असतात- एक स्वतः रुग्ण आणि दुसरा त्याच्या सभोवतालचे लोक. रुग्णापासून आपणास काही इजा होण्याची वा तो अचानक रौद्र रूप धारण करण्याची शक्यता गृहीत धरून लोक नकारात्मक भावना ठेवून त्याला टाळतात. त्यामुळे रुग्ण एकाकी पडून त्याची मानसिक स्थिती आणखीनच चिघळून हे दुष्टचक्र वाढतच जाते. याने त्याला कौटुंबिक, राहती जागा, नोकरी व आत्मसन्मान याविषयीच्या अनेक समस्या निर्माण होतात आणि जाहीर आहे तो ते समर्थपणे हाताळण्याच्या मानसिकतेत नसतोच. आणि याच कारणामुळे असे रुग्ण आपला आजार लपवितात व उपचार घेण्याच्या वा मानसोपचार केंद्रास भेट देण्याच्या भानगडीत पडत नाहीत कारण त्यांना भीती असते की लोक त्याला वेडा ठरवतील. अशाने या विनाउपचारी रुग्णांची संख्या वाढत जाते. कोरोनाच्या बाबतीतही हीच परिस्थिती आपणांस अनुभवावयास मिळाली होती. भारतीय समाजात अंदाजे ३७ टक्केलोक कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मानसिक आजाराने त्रस्त आहेत. परंतु आपल्यातील लक्षणे ही मानसिक आजाराचा भाग आहेत याबाबतीत ते अनभिज्ञ आहेत. बरेचजण वरील नमूद भीतीमुळे तर काही निष्काळजीपणा तर काही अज्ञानीपणामुळे मानसोपचाराकडे पाठ फिरवतात. गमतीची गोष्ट सांगायची तर मानसिक आजाराचे प्रामुख्याने आढळणारे लक्षण म्हणजे 'मला कसलाही मानसिक आजार नाही' ही रुग्णाची भावना!

**शारीरिक आणि मानसिक आजार**

मानसिक आजाराला शारीरिक आजारासारखाच एक सामान्य दोष मानायला आपला समाज तयारच होत नाही. मधुमेहामध्ये पॅनक्रियाजमधून इन्सुलिन नावाच्या केमिकलच्या कमी स्रावामुळे रुग्णास बाहेरून इन्सुलिन दिले जाते. हायपोथायरॉईडमध्ये थायरॉक्झीनच्या कमी स्रावामुळे बाहेरून थायरॉक्झीन दिले जाते.

या शारीरिक आजारांप्रमाणेच मानसिक आजारामध्ये सिरोटोनिन, बेन्झोडायझेपाईन्ससारख्या केमिकलच्या कमी स्रावामुळे डिप्रेशन येते म्हणून त्यास बाहेरून सिरोटोनिन (एसएसआरआय) दिले जाते. जर मधुमेह, हायपोथायरॉईडचे उपचार घेताना कोणताही न्यूनगंड वा शरमेची भावना नसते तर मग मानसोपचार घेताना तरी शरमेची भावना का असावी? मानसिक रुग्णांनी अशी कोणतीही भावना मनात न बाळगता खुलेपणाने मानसोपचार स्वीकारावा व समाजानेही अशा लोकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक चर्चा न करता सहानुभूतीचा ठेवल्यास मानसिक आजाराविषयी लोक समोर येतील. पर्यायाने मानसिक स्वास्थ्य व शारीरिक, सामाजिक स्वास्थ्य व स्वस्थ भारत निर्माण होईल.

# पक्षाघाताचा धोका

तुम्ही पक्षाघाताबद्दल ऐकले असेलच. मुख्यतः वृद्धत्व आणि शरीरातील रोगांमुळे पक्षाघाताचा धोका संभवतो. मात्र, आजकाल तरुणांमध्येही ही समस्या वाढत आहे. अर्धांगवायूच्या स्थितीमध्ये या आजारात शरीराचा एक भाग काम करणे बंद करतो. याला अर्धांगवायू देखील म्हणतात. ज्यामध्ये हात, पाय, तोंड आणि डोळे यांच्या एका बाजूला परिणाम होतो. अर्धांगवायूबद्दल अगोदर काहीही माहिती नसते, काही मिनिटांत त्याचा परिणाम शरीरावर होऊ शकतो. अशावेळी मनात प्रश्न येतो की, पक्षाघाताचा धोका कोणाला आहे आणि त्याची लक्षणे काय आहेत?



**अर्धांगवायू म्हणजे काय? :** अर्धांगवायूला ब्रेन स्ट्रोक असेही म्हणतात. या अवस्थेत मेंदूच्या कोणत्याही भागाला अचानक इजा झाल्यामुळे किंवा रक्तपुरवठा बंद झाल्यामुळे एका बाजूचे अवयव काम करणे बंद करतात. याला अर्धांगवायू म्हणतात. कधीकधी सौम्य स्ट्रोकमुळे शरीराच्या एका बाजूला खूप अशक्तपणा येतो.

**अर्धांगवायू का होतो? :** अर्धांगवायू होण्यामागे साधारणपणे दोन कारणे असतात, त्यातील एक म्हणजे ब्रेन हॅमरेज, म्हणजेच मेंदूकडे जाणारी रक्ताची नळी फुटणे. दुसरे कारण म्हणजे मेंदूला रक्तपुरवठा करणाऱ्या पाइपमध्ये काही प्रकारचा अडथळा निर्माण होणे. बहुतेक प्रकरणांमध्ये, पाइप ब्लॉक झाल्यामुळे ही समस्या उद्भवते. अहवालानुसार, ८५ टक्के पॅरालिसिसची प्रकरणे ब्लड पाइप ब्लॉक झाल्यामुळे होतात.

**पक्षाघाताचा धोका कोणाला जास्त? :** जर आपण जोखीम घटकाबद्दल बोललो, तर रक्तदाब रुग्ण, मधुमेह रुग्ण, लिपिड प्रोफाइल वाढल्यामुळे पक्षाघाताचा धोका जास्त असतो. ज्या लोकांना हृदयाशी संबंधित समस्या आहेत आणि रक्त गोठण्याची समस्या आहे त्यांना पक्षाघात होण्याची दाट शक्यता असते.

**पक्षाघाताची काही चिन्हे? :** अर्धांगवायू होण्यापूर्वी शरीरात कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. डॉक्टरांचे म्हणणे आहे की फारच कमी प्रकरणांमध्ये हे आधीच आढळून येते. हे फार लवकर घडते, जोपर्यंत रुग्णाला काही समजत नाही किंवा परिस्थिती हाताळण्याची संधीही मिळत नाही.

**सावधानता बाळगावी :** अर्धांगवायू झाला हे अगोदर कळत नाही, पण ज्यांना आधी लहानसा अर्धांगवायू होतो. त्यांनी याबाबत सजग राहावे. कधीकधी खूप कमी वेळ बोलण्यात अडचण येते किंवा शरीराच्या एका भागात अशक्तपणा येतो, तर ही सौम्य अर्धांगवायूची लक्षणे असू शकतात. तथापि, या परिस्थितीत, रुग्ण काही काळानंतर बरा होतो. हे अर्धांगवायूचे लक्षण मानले जाऊ शकते.

**अर्धांगवायूची लक्षणे? :** अर्धांगवायू झाल्यावर हात, पाय आणि तोंडावर परिणाम होतो. अशा परिस्थितीत एकीकडे चालणे, बोलणे, लिहिणे आणि व्यवस्थित काम करण्यात त्रास होतो. अशा रुग्णांमध्ये अशक्तपणा खूप येतो.

# गर्भाशयात गाठी का होतात?



सामान्य भाषेत सांगायचं झालं तर 'फायब्रॉईड' म्हणजे गर्भाशयात किंवा गर्भाशयाच्या बाजूला तयार होणारी गाठ. फायब्रॉईड्स एक-दोन किंवा अनेक असू शकतात. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार, फायब्रॉईड म्हणजे कॅन्सरची गाठ अजिबात नाही. फायब्रॉईड्स स्नायूपेशी आणि तंतुपेशी यांच्यापासून बनलेले असतात. फायब्रॉईड्स कशामुळे होतात याचं निश्चित कारण सांगता येत नाही. तज्ज्ञ म्हणतात, तिशीच्या आसपास असलेल्या स्त्रियांपैकी २० टक्के महिलांच्या गर्भाशयात गाठी होण्याची शक्यता असते.

**फायब्रॉईड्सची लक्षणं काय? :** तज्ज्ञांच्या माहितीनुसार पाळीच्या दिवसात अतिरिक्त स्राव होणे, पाळी लवकर येणं आणि पाळीच्या दिवसात खूप जास्त वेदना होणं याचं एक प्रमुख कारण फायब्रॉईड्स असण्याची शक्यता असते.

* पाळीच्या दिवसात होणारा अतिरक्तस्राव * पाळी एका आठवड्यापेक्षा जास्त काळ राहणे * सारखं लघवीला होणं * पाठदुखी

तज्ज्ञ सांगतात की, गाठ कुठे आहे आणि किती आहेत यावरून महिलांना होणारा त्रास अवलंबून असतो. एक किंवा दोन गाठी असल्या तर त्रास फार जास्त होत नाही. पण, गाठीच्या आकारात वाढ झाली किंवा गाठींची संख्या वाढली तर लक्षणं दिसू लागतात.

**फायब्रॉईड्स कशामुळे होतात? :** केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार, फायब्रॉईड्स कशामुळे होतात याचं ठोस कारण नाही. गर्भाशयाचे स्नायू गुळगुळीत आणि लवचिक असतात. या स्नायूंची अतिरिक्त वाढ झाल्यामुळे फायब्रॉईड्स तयार होतात.

**फायब्रॉईड्स होण्याची कारणं :** आनुवंशिकता- अनेक फायब्रोइड्स आनुवंशिक घटकांमुळे होतात.

**हार्मोन-** फायब्रोईडममध्ये महिलांच्या शरीरातून निघणाऱ्या इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्ट्रोन होर्मोनचं प्रमाण गर्भाशयातील स्नायूंपेक्षा जास्त असतं. गर्भाशय तीन थरांचं बनलेलं असतं. यातील मधल्या अस्तरातील स्नायूपेशींची काही कारणांमुळे जास्त वाढ झाल्यास त्याचं रूपांतर लहान-मोठ्या गाठीत होतं. याला 'तंतुस्नायू-अर्बुद' असं म्हणतात. फायब्रॉईड्सच्या गाठींची सुरवात गर्भाशयाच्या मधल्या अस्तरात होते. त्यानंतर यांचा आकार हळूहळू वाढत जाऊन ते आतल्या किंवा बाहेरच्या अस्तरावर दवाब आणतात. गाठीचा आकार वाढल्याने ओटीपोटातील गर्भाशय पोटाच्या पोकळीत वाढू लागतं. त्यामुळे पोटात जड वाटू लागतं. काहीवेळा मूत्राशय किंवा गुदद्वारावर भार पडल्यामुळे लघवीला त्रास होणं किंवा बद्धकोष्ठतेचा त्रास होण्याची शक्यता असते.

**फायब्रॉईड्सचे प्रकार? :**

फायब्रोईड्सचे चार प्रमुख प्रकार आहेत.

**इंट्राम्युरल फायब्रॉईड्स-** हे फायब्रॉईड्स गर्भाशयाच्या स्नायूंमध्ये तयार होतात. सामान्यतः याच जागेत गाठी तयार होतात.

**सब सिरोस फायब्रॉईड्स-** या गाठी गर्भाशयाच्या बाहेर तयार होतात.

**सब म्युकस फायब्रॉईड्स -** या गाठी गर्भाशयाच्या मध्यभागी तयार होतात

**पेडूनक्युलेटेड फायब्रोइड्स-** या गाठी गर्भाशयाच्या बाजूला तयार होतात

**फायब्रॉईड्सचा त्रास कोणाला होऊ शकतो?**

फायब्रॉईड्स होण्यामागे बऱ्याच वेळा आनुवंशिकता कारण असू शकतं. आजी, आईला फायब्रॉईड्सचा त्रास असल्यास नात, मुलगी यांच्यामध्ये सुद्धा फायब्रॉईड तयार होण्याची शक्यता असते. स्त्रीरोगतज्ज्ञांच्या माहितीनुसार, २० ते ४५ वयोगटातील प्रजननक्षम महिलांमध्ये फायब्रॉईड्स होण्याची शक्यता जास्त असते. डॉ. इंद्राणी साळुंखे सांगतात, मासिक पाळी लवकर आल्यास किंवा रजोनिवृत्ती उशिरा आल्यासही फायब्रॉईड होण्याची शक्यता असते. तज्ज्ञांच्या माहितीनुसार लग्न न झालेल्या स्त्रिया, वंध्यत्वाने ग्रासलेल्या स्त्रिया, एखादंच मूल असलेल्या स्त्रियांमध्ये फायब्रोइड्स जास्त प्रमाणात आढळून येतात. काही वेळा लहान वयामध्ये विशीच्या आतही या गाठी गर्भाशयात वाढीला लागतात. फायब्रॉईड मोठे आणि गर्भाशयाच्या आतील भागात असतील तर प्रजननासाठी त्रास होऊ शकतो. जर इंट्राम्युरल फायब्रॉईडमुळे काहीवेळा गर्भपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**फायब्रॉईड्सवर उपाय ? :** महिलेच्या शरीरात फायब्रॉईड्सची संख्या जास्त असेल, आकार मोठा असेल किंवा यामुळे पाळीचा त्रास होत असेल तर तज्ज्ञांच्या माहितीनुसार शस्त्रक्रिया करून गाठी काढाव्या लागतात. यात मायमेक्टॉमी आणि हेस्ट्रेक्टॉमी या दोन प्रमुख शस्त्रक्रिया आहेत.

**मायमेक्टॉमी-** महिलेला भविष्यात मूल व्हावं अशी इच्छा असेल तर गर्भाशय आणि गर्भाशयाच्या भिंतींवरील गाठी काढून गर्भाशय तसंच ठेवलं जातं. पण ही शस्त्रक्रिया प्रत्येकवेळी शक्य असतेच असं नाही.


**हेस्टरेक्टॉमी-** फायब्रोइडसाठी ही सामान्यतः केली जाणारी शस्त्रक्रिया आहे. यात महिलेचं गर्भाशय काढून टाकण्यात येतं.

तज्ज्ञ म्हणतात की, वयाची पस्तिशी ओलांडलेल्या माहिलेला फायब्रॉईड्सचा त्रास होत असेल तर गर्भाशय काढून टाकणं योग्य ठरतं आणि महिला ४५ वर्षांपेक्षा जास्त असेल तर गर्भाशयासोबत काहीवेळा स्त्रीबीजकोषही काढून टाकण्यात येतो. तज्ज्ञ सांगतात, की एखादी छोटी गाठ असेल तर गर्भाशय काढून टाकण्याची गरज नसते. गर्भाशयातील गाठ वाढत नसेल तर शस्त्रक्रिया करण्याची गरज नसते. पण फायब्रॉइड्सचा त्रास असलेल्या एखाद्या महिलेला गर्भाशय काढायचं नसेल तर काय उपाय आहे. अशा महिलांमध्ये गर्भाशयाच्या आत एक वस्तू बसवली जाते. यावर प्रोजेस्ट्रोन हार्मोन असतात. यामुळे रक्तस्राव नियंत्रणात येण्यास मदत होते. महिलांच्या गर्भाशयात बसवण्यात येणाऱ्या वस्तूला सामान्य भाषेत 'कॉपर-टी' असं म्हटलं जातं.

# झोप न येणे

सर मला झोपच येत नाही. रात्री बारा, एकपर्यंत जागाच असतो. दिवसभर कितीही जरी काम केलं तरी रात्री मला झोप येतच नाही. सतत तळमळत असतो, एका कुशीवरुन दुसऱ्या कुशिवर वळत असतो परंतु सर मला झोपच येत नाही. काय कारण असेल? कशामुळे? काम तर मी भरपूर करतो पण मला झोप येत नाही. आणि म्हणून सकाळी उठल्यानंतर फ्रेशच वाटत नाही. थकवा येतो दिवसभर मग बरोबर ना?

सोलापूरमध्ये आपल्या आसपास असे बरेच लोकअसतात जे वरील तक्रार घेऊन ते दवाखान्याच्या



दवाखाने पालथे घालत असतात. झोपेच्या गोळ्या द्या. झोपेच्या गोळ्या द्या म्हणून डॉक्टरांच्या मागे लागलेले असतात. बरोबर ना? दुसऱ्या बाजूला आपल्या आसपास काही माणसं अशी असतात की जी दिवसभर **energetic** असतात. कायम उत्साहित असतात. तुम्हाला ही त्यांच्यासारखेच दिवसभर **0** राहायचं? उत्तर सोपं आहे. भरपूर शांत झोप आवश्यक आहे. पण होत नाही. म्हणूनच वरील फोटोत दाखवल्याप्रमाणे काही **Dos and Donts** पाळा..जे ने करून **next** डे तुम्ही देखील फ्रेश राहचाल. मोबाइल बेडच्या दूर फेकून द्या. चार्जिंगदेखील दुसऱ्या रूममध्ये लावून ठेवून द्या. बेडरूममध्ये मोबाइल रात्री अजिबात ठेवायचा नाही.

हा साधा नियम जरी पाळला तरी चांगली झोप येईल. पुस्तक वाचन झोपेच्या आधी नको. **TV** तर अजिबात नकोच. Lights off असतील तर मेंदूला शांत झोप लागेल. झोपण्याची दररोजची जागा सहसा फिक्स असावी, बेडरूममध्ये झोपण्याची सवय लावावी. हॉलमध्ये टीव्ही बघत सोफ्यावर तरी अजिबात झोपू नये आणि हो भरपूर पाणी पिऊनच झोपायला हवे. प्रत्येक माणसाला कमीत कमी सहा ते आठ तास झोप हवीच हवी.

चला... निवांत गावी निवांत झोप पाहिजेच आता !!

# जगातील वीस कोटी लोक पाहातात दिवास्वप्न

ब्रिटनमधील नवीन संशोधनात दिसून आले आहे की, दीर्घकाळ दिवास्वप्न पाहणे ही एक धोकादायक स्थिती आहे. लोक जितके चिंताग्रस्त होऊ लागतात, तितकेच विचारांमध्ये बुडू लागतात. संशोधनात सहभागी असलेल्या 'ससेक्स युनिव्हर्सिटी'च्या सहयोगी व्याख्याता ज्युलिया पोरियो म्हणतात की जगभरातील अडीच कोटी लोक म्हणजे २० कोटी लोक जास्त दिवस स्वप्न पाहत आहेत. याला 'मॅलडाप्टिव्ह डे-ड्रीमिंग' म्हणतात. या अवस्थेत लोक तासन्तास विचारात मग्न राहतात. दुसऱ्या अभ्यासातून दिसून आले आहे की, दिवसा स्वप्न पाहणारे लोक त्यांचे झोपेचे अर्धे तास दिवास्वप्न पाहण्यात घालवतात. ते त्यांच्या समस्यांवर उपाय त्यांच्या विचारांमध्ये शोधतात. ते आपली जबाबदारी टाळू लागतात. कुटुंबातील नाती कमकुवत होऊ लागतात. दिवास्वप्न पाहण्याच्या सवयीमुळे असाहाय्य लोकांना लाज वाटू लागते; परंतु इच्छा असूनही ते स्वतःला थांबवू शकत नाहीत. त्यांची झोपही पूर्ण होत नाही.

दिवास्वप्नामुळे नैराश्यासारखे अनेक आजार होण्याचा धोका असतो. दिवास्वप्न पाहणे इतर अनेक आजारांना जन्म देत आहे. यामुळे चिंता, नैराश्य आदींचा त्रास वाढत आहे. स्वतःबद्दल खूप विचार करणारे आणि बरे होण्याचा विचार करणारे आजारी पडत आहेत. त्यांना या आजारांची माहितीही नसते. संशोधनात दिसून आले आहे की, दिवसा स्वप्ने पाहणाऱ्या अर्ध्या लोकांमध्ये 'ऑब्सेसिव्ह कंम्पल्सिव्ह डिसऑर्डर' असते. असे लोक 'सोशल मीडिया'वर अधिक सक्रिय होत आहेत. इथेही ते सुटका करण्याचे मार्ग शोधत आहेत.

दिवास्वप्न पाहण्याचे काही फायदेही आहेत. दिवास्वप्न पाहण्याचे फक्त तोटे आहेत, असे नाही. त्याचे काही प्रमाणात फायदेही आहेत. ते एखाद्या औषधाप्रमाणे अतिशक्ती देत नसेल, तर तणाव दूर करण्यास मदत करते. ते एकाकीपणासाठी वरदान आहे आणि कंटाळा दूर करते. समस्या सोडवण्यास मदत करते. यामुळे कधी कधी सर्जनशीलता वाढते. अपघात किंवा मोठ्या आघातामुळे झालेल्या धक्क्यातून सावरता येते. दिवास्वप्न पाहून एखादी व्यक्ती स्वतःला काही काळ विस्मरणात ठेवू शकते. यामुळे अनेक नकारात्मक गोष्टी विसरण्यास मदत होते.

# पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार ०३ ते ०९ जानेवारी - २०२३




## संपादकीय...



# टफ टास्क मास्टर

शेअर बाजार हा विषय आता केवळ विशिष्ट वर्तुळापुरता सीमित राहिलेला नाही. तेथील घडामोडींविषयी सर्वसामान्यांमधील उत्सुकताही वाढली आहे. केवळ उत्सुकताच नव्हे, तर गुंतवणुकीचा पर्याय म्हणून मोठ्या प्रमाणावर लोक त्याकडे वळत आहेत.

त्यांची जिज्ञासा केवळ शेअरच्या भावांमधील चढउतारांशी आणि त्यांच्या कारणांशी संबंधित असते, असे मानता येणार नाही. हा सगळा जो गुंतवणूक आणि परताव्याचा 'खेळ' सुरू असतो, त्यात कधी सरशी, कधी पिछाडी असे होणारच, हे बहुतेकांना ठाऊक असते.

मात्र काही मूलभूत नियम आणि शिस्तशीर कार्यपद्धतीनेच तो चालतो आहे ना, याविषयी गुंतवणूकदार म्हणून प्रत्येकाला आस्था नि काळजी वाटणे स्वाभाविक आहे. त्यामुळेच या सगळ्याचे व्यवस्थापन करणाऱ्या अधिकारी मंडळींचे विशेष महत्त्व आहे.

आशियातील पहिला आणि देशातील सर्वांत मोठा शेअर बाजार म्हणून ओळख असलेल्या मुंबई शेअर बाजाराची (बीएसई) सूत्रे सुंदररामन राममूर्ती हाती घेणार आहेत, याची त्यामुळेच दखल घेतली जाणे क्रमप्राप्त आहे.

येत्या चार जानेवारीपासून ६२ वर्षीय राममूर्ती 'बीएसई'चे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून धुरा सांभाळतील. राममूर्ती यांचा अनुभव विविधांगी आणि व्यापक आहे. मुख्य म्हणजे परदेशातील रोखे बाजारांच्या कामाची त्यांना सखोल माहिती आहे.

'बँक ऑफ अमेरिके'च्या भारतीय शाखेत व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. जागतिक स्तरावरील प्रशासन, भारतातील बँकिंग घटकाचे नियंत्रण आणि सिक्युरिटीज विभाग यांची जबाबदारी त्यांच्याकडे होती. त्यांची ख्याती कठोर शिस्तीचा प्रशासक अशी आहे. ''कठीणातील कठीण कामेही ते लीलया पार पाडतात. आपल्या निर्णयावर ते ठाम असतात. त्यामुळे याबाबतीत त्यांच्यावर कोणी अवाजवी प्रभाव टाकू शकत नाही. मूल्ये, तत्त्वे, नियम याबाबत कोणतीही तडजोड करण्यास ते तयार नसतात. त्यामुळे अनेकदा त्यांचा सहकाऱ्यांशी संघर्ष होतो,'' असे बँक ऑफ अमेरिकेतील त्यांचे सहकारी म्हणतात. 'टफ टास्क मास्टर' अशी त्यांची ओळख आहे.

'कॉर्पोरेट गव्हर्नन्स'मधील त्यांचे कौशल्य वाखाखण्याजोगे आहे, असेही त्यांचे सहकारी सांगतात. या विभागातील विविध समस्यांचे निराकरण करणे आणि व्यापाऱ्यांना आकर्षित करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने राममूर्ती यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांचा या क्षेत्रातील अनुभव आणि विशेष कौशल्यामुळे, 'बीएसई'ला आपले उद्दिष्ट साध्य करण्यात यश मिळू शकेल, असे मानले जात आहे.

विज्ञानाचे पदवीधर आणि चार्टर्ड अकाउंटंट असलेले राममूर्ती यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात आयडीबीआय बँकेतून केली होती. त्यानंतर ते 'एनएसई'त आले. 'एनएसई'च्या स्थापनेपासून म्हणजे १९९५ ते २०१४पर्यंतच्या काळात ते विविध पदांवर कार्यरत होते.

तेथील तांत्रिक परिवर्तन, आर्थिक व्यवहारांचा वेळच्या वेळी निपटारा तसेच विशिष्ट कालावधीत सौदेपूर्तता या सगळ्या गोष्टींमध्ये राममूर्ती यांचा सहभाग मोठा होता. इक्विटी डेरिव्हेटिव्ह विभागातही त्यांनी लक्षणीय छाप उमटवली.

आज 'इक्विटी डेरिव्हेटिव्ह'मध्ये 'एनएसई'चा जवळपास ९० टक्के हिस्सा आहे. 'बँक निफ्टी'च्या यशातही त्यांचा मोलाचा वाटा आहे. राममूर्ती यांनी 'एनएसई'मध्ये नॅशनल सिक्युरिटीज क्लिअरिंग कॉर्पोरेशन, एक्सचेंजचे क्लिअरिंग हाउसचे नेतृत्वही यशस्वीरित्या केले.गेल्या जुलैपासून 'बीएसई'तील हे पद रिक्त होते.

या आधी आशिष चौहान यांच्याकडे या पदाची जबाबदारी होती.

# आव्हानाआधीचे आव्हान!

सन २०२३ हे वर्ष लोकसंख्येत चीनला आपण मागे टाकण्याचे, 'जी२०'च्या भारतीय यजमानपदाचे, नऊ विधानसभांच्या निवडणुकीचे आणि कदाचित मंदीचेही.. प्रत्येक नवे उगवणारे वर्ष नवीन आव्हाने घेऊन अवतरत असते आणि काही जुन्या समस्या सोडवत असते. यंदाचे वर्ष मात्र यास अपवाद. कारण ते सरत्या वर्षांची आव्हाने पुढे घेऊन जाईल आणि काही नव्या आव्हानांस जन्म देईल. ही आव्हाने आर्थिक, आंतरराष्ट्रीय राजनैतिक आणि देशांतर्गत राजकीय अशी असतील. नववर्षांच्या प्रथमदिनी या सर्वाची उजळणी करणे समयोचित ठरेल. या वर्षांच्या पहिल्या काही महिन्यांत आपण एक विक्रम नोंदवू. यंदाच्या मार्च वा एप्रिलपर्यंत भारत हा चीनला मागे टाकेल. हा मुद्दा असेल लोकसंख्येचा. अशा तऱ्हेने एका तरी घटकावर चीनवर मात करण्यात आपणास यश येईल. संयुक्त राष्ट्रांचा अंदाज असा की भारत १४० कोटी जनांचा टप्पा यंदा पार करेल आणि चीनची लोकसंख्या मात्र आकसण्यास सुरुवात होईल. यातील निम्म्यापेक्षा थोडे कमी उत्पादक वयाचे असतील. चीनमध्ये हे प्रमाण दोनतृतीयांश इतके आहे. याचा अर्थ टक्केवारीच्या मुद्द्यावर भारतात चीनपेक्षा अधिक तरुण 'तयार' झालेले असतील. म्हणजेच इतक्या साऱ्यांस रोजगार वा वेतन संधी उपलब्ध करून देणे आवश्यक ठरेल. एका बाजूला चीनच्या तुलनेत आपण सर्वाधिक जनसंख्या कमावणार असलो तरी आपली कमाई चीनच्या तुलनेत एकषष्ठांश इतकीच असेल. म्हणजे चीनची अर्थव्यवस्था आपल्यापेक्षा सहा पटीने मोठी राहील. याचा अर्थ सरळ आहे. चीनशी आपण लोकसंख्येबाबत जरी बरोबरी करून त्या देशास मागे टाकणार असलो तरी



आर्थिक मुद्द्यावर चीन आपल्यापेक्षा पुढे असेल. चीनची परकीय चलनाची गंगाजळी साधारण तीन लाख कोटी डॉलर्सहून अधिक आहे. म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेचा जितका एकूण आकार तितकी चीनची केवळ श्रीशिल्लक. त्या देशाची आर्थिक ताकद इतकी मोठी आहे की ऐन करोनाकाळातही जगाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात चीनचा वाटा सुमारे १६ टक्के इतका होता. गेल्या दोन दशकांत चीनने लष्करावरील खर्चात सहा पटींनी वाढ केली असून ताज्या आकडेवारीनुसार त्या देशाचा लष्करी अर्थसंकल्प २४,००० कोटी डॉलर्स इतका महाप्रचंड झाला आहे. त्यापेक्षा अधिक रक्कम केवळ लष्करासाठी खर्च करण्याची ऐपत फक्त अमेरिकेचीच. जगातील त्या एकमेव महासत्तेचा लष्करी अर्थसंकल्प ६३,४०० कोटी डॉलर्सचा असून या दोन देशांखालोखाल लष्करी अर्थसंकल्प असणाऱ्या सौदी अरेबिया आणि रशिया या देशांची तरतूद जेमतेम ६५०० कोटी डॉलर्स इतकीच आहे. हे सत्य लक्षात घेतल्यास लडाख आणि आता तवांग खोऱ्यातील चिनी घुसखोरीचे गांभीर्य अधोरेखित होईल. आपण कितीही दावा करीत असलो तरी लडाखमधील चिनी घुसखोरीची समस्या मिटलेली नाही आणि तवांग आघाडी उघडून चीनने आपल्या डोकेदुखीत वाढच केलेली आहे. तेव्हा गेल्या दोन वर्षांपासून आपणासमोर भेडसावणारे चिनी आव्हान २०२३ या सालात अधिकच गंभीर होईल यात शंका नाही. करोनाच्या फेरउद्रेकाने चीन जरी गारठल्यासारखा वाटत असला तरी देशातील नागरिकांचे लक्ष विचलित करण्यासाठी यंदा तो अधिकच कुरापत काढण्याचा धोका अधिक.

हे वर्ष 'जी२०'च्या भारतीय यजमानपदाचे. 'जी२०' हे खरेतर एक सैलसर, अनौपचारिक संघटन. इतरांच्याच तुलनेत ज्यांचे बरे चालले आहे अशा दहा-बारा मित्रांनी आलटून-पालटून एकमेकांच्या घरी भेटीबैठका कराव्यात तसे हे 'जी२०'. अधिक मध्यमवर्गीय उपमा द्यावयाची तर या 'जी२०' यजमानपदास भिशी म्हणणे रास्त ठरेल. ही भिशी त्यातील प्रत्येकालाच कधी ना कधी लागते. तेव्हा भिशी लागली म्हणून उगाच हुरळून जाण्याचे काही कारण नाही. ही भिशी आंतरराष्ट्रीय आणि जगातील देशप्रमुखांची हाच काय तो फरक. परंतु प्रत्येक संधीचे समारंभीकरण करावयाची सवय जडली की 'जी २०'चे यजमानपद हेदेखील उत्सवाचे निमित्त ठरते. तेव्हा सध्याचे वर्षभर या देशप्रमुखांचे भारत-पर्यटन सुरू राहील आणि त्या निमित्ताने विविधरंगी वस्त्रप्रावरणे आणि शिरस्त्राणे मिरवता येतील. विविध भारतीय स्थळांतील पर्यटनास यामुळे चालना मिळेल आणि स्थानिकांस काही प्रमाणात रोजगार उपलब्ध होतील. हा तसा या 'जी२०'च्या यजमानपदाचा फायदाच म्हणायचा.

हे वर्ष मंदीचे असेल असे भाकीत जगातील अनेक प्रमुख वित्तसंस्था आणि तज्ज्ञ वर्तवतात. हे एक भाकीत असे की ते चुकल्यास समस्त आनंदतील. तथापि तशी शक्यता कमीच. त्यात चीनमधील करोनाची व्याप्ती वाढत गेल्यास उद्या येणारी मंदी आजच येण्यावर भीती. चीनच्या या संकटामुळे आरोग्यापेक्षा अधिक किंवा तितकाच धोका आहे तो जागतिक वस्तू-धान्यपुरवठा साखळीस. चीनविषयी आपण कितीही कडाकडा बोटे मोडली तरी आजही चीन आपल्या सर्वात मोठ्या मालपुरवठा देशांतील एक आहे याकडे दुर्लक्ष करता येणारे नाही. अभियांत्रिकी सामग्री ते औषधे अशा सर्वच घटकांत चीन आपला सर्वात मोठा मालपुरवठादार. आधीच युक्रेन-रशिया युद्धाने ध्वस्त झालेली वस्तू-धान्यपुरवठा साखळी चीनमधील करोनाच्या नवसाथीने अधिकच विस्कळीत होईल हे ताडण्यास कोणा तज्ज्ञाची गरज नाही. हे झाले सध्याच्या वर्षांचे जागतिक वास्तव.

या वास्तवास देशांतर्गत आव्हान असेल ते विविध विधानसभा निवडणुकांचे. या वर्षांत आणि पुढील वर्षांच्या काही महिन्यांत तब्बल नऊ राज्ये विधानसभा निवडणुकांस सामोरी जातील. यातील मेघालय, नागालँड, त्रिपुरा, मिझोराम अशी तुलनेने लहान राज्ये वगळली तरी कर्नाटक, छत्तीसगड, राजस्थान, मध्य प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांतील निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. या निवडणूक हंगामाचा प्रारंभ दक्षिणेतील कर्नाटकातून होईल. या राज्यात गेल्या निवडणुकांत देवेगौडा यांचा जनता दल (सेक्युलर) आणि काँग्रेस यांचे सरकार आले. तथापि देवेगौडा-पुत्र कुमारस्वामी यांस कात्रजचा घाट दाखवून भाजपने त्यांच्या पायाखालचे सत्ताजाजम खेचून घेतले. हे एक प्रकारे उद्धव ठाकरे यांचे जे झाले तेच. त्यानंतर आधी येडियुरप्पा आणि आता बोम्मई यांच्या हाती भाजपने सत्तासूत्रे दिली. दोघेही कमीअधिक प्रमाणात भाजपसाठी डोकेदुखीच ठरले. त्यामुळे कर्नाटक विधानसभा निवडणूक या वेळी अटीतटीची होईल हे निश्चित. यासह मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या राज्यांतही गत निवडणुकांत काँग्रेसची सत्ता आली. त्यांतील मध्य प्रदेश भाजपस मागच्या दाराने काबीज करता आले. राजस्थान आणि छत्तीसगडात काँग्रेस सरकारे कशीबशी तगून आहेत. या राज्यांत त्यामुळे काँग्रेसला निर्णायकरीत्या पराभूत करण्यात आणि मध्य प्रदेशात आहे ती सत्ता टिकविण्यासाठी भाजप आपले सर्वस्व पणास लावणार. यातील राजस्थानात भाजपच्या जुन्याजाणत्या वसुंधरा राजे काय करतात हे पाहणे राजकीय औत्सुक्याचे ठरेल. भाजपच्या दोन सर्वोच्च नेत्यांस शरणागत न जाणारे देशात जे काही दोनपाच नेते भाजपत अजूनही तगून असतील त्यातील एक वसुंधरा राजे. त्यामुळे राजस्थानातील लढत अधिक चुरशीची असेल.

## मुंबई गुन्हे शाखेची मोठी कारवाई!

पथकाने नायजेरियन महिलेला अटक केली. तिच्याकडे 460 ग्रॅम मेफेड्रोन सापडले आहे. असे एकूण 610 ग्राम मेफेड्रोने जप्त करून तिघांना अटक केले. यात आणखी किती जणांचा समावेश आहे याचा तपास पोलिस करत आहेत. अटक केलेल्या आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना 6 जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. एका दिवसात दोन मोठ्या कारवाया नवीन वर्षाच्या स्वागतानिमित्त मुंबई पोलिसांची खबरदारी म्हणून काल आणि आज मुंबईत सुरक्षा व्यवस्थेत वाढ केली. याच्याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी काल अनेक कारवाया केल्या आहेत. त्यातील आज एकाच दिवसात दोन मोठ्या कारवाया केल्या आहेत. गुन्हे शाखा पोलिसांनी आज सकाळीच खारघर येथून सव्वा कोटीचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. याप्रकरणी 17 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यामध्ये 16 नायजेरियन व्यक्ती आहेत. त्यांच्याकडून 83 लाख रूपयांचे हेरॉईन आणि 29 लाख रूपयांचा गांजा जप्त करण्यात आला आहे. आज सकाळच्या कारवाईत खारघर येथील एका रो हाऊसमध्ये मोठ्या प्रमाणात अमली पदार्थाची विक्री होत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखा उपायुक्त अमित काळे यांनी गुन्हे शाखेचे एकत्रित पथक तयार केले होते. या पथकाने शुक्रवारी खारघर सेक्टर 12 येथील सी 49 या रो हाऊसवर छापा टाकला. त्यावेळी रो हाऊसच्या तळमजल्यावर आणि पहिल्या मजल्यावर जमलेल्या नायजेरियन व्यक्तींनी पोलिसांना धक्काबुकी करून पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतु, पोलिसांनी 17 जणांना बेड्या ठोकल्या. अटक करण्यात आलेल्या 16 नायजेरियन संशयितांमधील सहा महिला आहेत.

## क्रूरतेचा कळस... डोक्यात संशयाचं भूत

तिला उपचारासाठी नागपुरात पाठवण्यात आलं. 31 डिसेंबर रोजी प्रतीक्षानं एका गोंडस बाळाला जन्म दिला. त्याच दिवशी रात्री साडेसहा वाजताच्या सुमारास नागपूरच्या शासकीय रुग्णालयात गिरीश प्रतीक्षा असलेल्या वॉर्डमध्ये आला. त्यावेळीही संशयाचं भूत त्याच्या डोक्यात फिरत होतंच. वॉर्डमध्ये प्रतीक्षाजवळ जाऊन त्यानं विचारपूस करण्याऐवजी तिच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. दोघांमधील वाद विकोपाला गेला. त्यानंतर संताप अनावर झालेल्या गिरीशनं मोठमोठ्यानं प्रतिक्षाला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तो एवढ्यावरच थांबला नाहीतर त्यानं दोन दिवसांच्या बाळाला उचललं आणि उचलून फरशीवर आपटलं. निर्दयी बापानं चिमुकल्या बाळाला रागात उचलून कसलाही विचार न करता थेट फरशीवर आपटलं. बाळाची प्रकृती गंभीर असून त्याला गंभीर दुखापतही झाली आहे. प्रकृती गंभीर झाल्यानं बाळावर नागपुरच्या शासकीय रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

## मुंबई पोलिसांची मोठी कारवाई!

आरोपींनी आतापर्यंत शेकडो लोकांची फसवणूक केली असल्याचे पोलिसांच्या तपासातून समोर आलंय. मुंबई पोलिसांनी याबाबत अधिक तपास केल्यानंतर अटक करण्यात आलेल्या आरोपींनी OLX च्या नावाने फसवणूक तर केलीच आहे. परंतु, सेक्शटोर्शनचीही मोडस ओप्रेडी समोर आली आहे. या टोळीने मुंबईत असे 11 गुन्हे केले आहेत. या सर्व 11 गन्ह्यांचा मुंबई पोलिस कसून तपास करत आहेत. या टोळीसोबत आणखी कोणाचा सहभाग आहे का? फसवणूक सोडून आणखी काही गुन्हे या टोळीने केले आहेत का? याचा देखील पोलिस कसून तपास करत आहेत. मुंबई पोलिसांनी एका तक्रारीवरून या टोळीचा पर्दाफाश केलाय. मुख्य तक्रार देणाऱ्या फिर्यादीची सुरतहून मुंबईला बदली झाली होती. संबंधित व्यक्तीने फर्निचर विक्रीसाठी OLX वर जाहीरात दिली होती. या जाहिरातीचा फायदा घेऊन आरोपींनी तक्रादाराची फसवणूक केली. त्यानंतर सबंधितांनी मुंबई पोलिसांकडे तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल केला आणि तपास सुरू केला. मुंबई पोलिसांच्या सायबर सेलने याबाबत कसून तपास केल्यानंतर आरोपींबाबत धागेदोरे हाती लागले. खोलात जाऊन तपास केल्यानंतर फसवणूक करणारे आरोपी हे राजस्थान आणि उत्तर प्रदेशमधील असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांच्या एका पथकाने दोन्ही राज्यांतून चार आरोपींना बेड्या ठोकल्या.

## मुंबईत श्रीमंत लोकांना लुबाडायची

महिलेने त्यांना खोणी येथील एका हॉटेलला जेवण्यासाठी बोलावले. हॉटेलच्या बंद खोलीत जेवण झाल्यानंतर फिर्यादी बाथरूममध्ये गेला. बाथरुममध्ये गेल्याची संधी साधत या महिलेने त्यांचे परवानाधारक रिव्हॉल्वर, एक मोबाईल, सोन्याच्या तीन चैन, हातातील सोन्याचे कडे आणि घड्याळ असा चार लाख 75 हजार रुपयांचा ऐवज घेऊन पळ काढला. या प्रकरणी महेश पाटील यांनी मानपाडा पोलिसात तक्रार दिली होती. मात्र या महिलेचा मोबाईल नंबर किंवा पत्ता त्यांच्याकडे नव्हता. यामुळे केवळ फेसबुकच्या माहितीवरून या महिलेचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी आणि अंमलदार यांना तातडीने शोध घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

तपासात महिला मुंबईतील असल्याचे कळले पोलिसांनी फेसबुक वरून तिचे अकाउंट चेक करत तिच्यावर काही गुन्हे आहेत का याचा शोध घेतला. यावेळी डोंबिवली रेल्वे पोलिसात तिच्याविरोधात गुन्ह्याची नोंद असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यावरून ही महिला खारमध्ये राहत असल्याचे कळताच पोलिसांनी खार गाठले. गोव्यातून दोघांना घेतले ताब्यात मात्र ती गोवा येथे गेल्याचे कळताच पोलिसांनी गोवा म्हापसा येथून या महिलेसह तिच्या साथीदाराला ताब्यात घेतले. तिच्याकडे केलेल्या चौकशीत या महिलेने यापूर्वी देखील फेसबुकवरून श्रीमंत लोकांना हेरून त्यांचा विश्वास संपादन करत त्यांना वेगवेगळया हॉटेलला बोलावले. त्यानंतर त्यांच्या दारूमध्ये गुंगीचे औषध टाकत त्यांच्याकडील सोन्याचे दागिने, मोबाईल अशा किमती वस्तू चोरून मुंबई टू गोवा विमानाचा प्रवास करत गोव्यात राहणाऱ्या विलेंडर डिकोस्टाकडे देत होती. तिथे तिचा मित्र त्या वस्तूची विल्हेवाट लावत असल्याचे उघड झाले. मात्र बदनामीच्या भीतीने आतापर्यंत कोणीही आपल्या विरोधात तक्रार करत नसल्याने तिचे मनोबल वाढले अशी माहिती तिने तपासात दिली. चोरलेल्या वस्तूची गोव्यातील आपला साथीदार विलेंडर डिकोस्टा याच्या मदतीने विल्हेवाट लावत होती.

## वाशी पोलीसांची कारवाई ;

गाडीमध्ये बसलेली आफ्रिकन वंशाची महिला घाईघाईने गाडीतुन उतरून वाहतुकीच्या गर्दीत निघुन गेली. पोलीसांनी कार चालकाची चौकशी सुरू केली. मात्र समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने त्याच्याकडे असलेल्या बॅगेतील साहित्याची तपासणी केली. बॅगेमध्ये सफेद रंगाचा अंमली पदार्थ सदृष्य पदार्थ दिसुन आल्याने पोलीसांनी वरिष्ठांना कळवले. तपास चालु : महाराष्ट्र सहायक पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद तोरडमल यांनी सदर व्यक्तीवर वाशी पोलीस ठाणे येथे एनडीपीएस ॲक्ट 1985 चे कलम 8 (क), 21(क), 29 नुसार गुन्हा नोंद केला आहे. मोईन खान अफझल खान पठाण असे, या 31 वर्षीय कारचालकाचे नाव असून तो गुजरात राज्यातील सुरतमधील लालगेटचा राहणार आहे. मोईनने गुन्हयात वापरलेली होंडा सिटी कारदेखील जप्त करण्यात आली आहे. त्याच्याकडून एकुण 26,94,100 रूपये मुद्देमाल त्याच्याकडून हस्तगत करण्यात आला आहे. प्राथमिक तपासावरून सदरचा एम्फेटामाईन हा अंमली पदार्थ गुजराज राज्यातुन विक्री करता आणला असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. सदरचा अमली पदार्थ हा नवीन वर्षाचे अनुषंगाने विक्रीसाठी आणला असावा, यादृष्टीने तपास सुरू असल्याची माहिती पोलीसांनी दिली आहे. दरम्यान आरोपीची सहकारी आफ्रिकन वंशाच्या महिलेचा शोध सुरू आहे. आरोपी मोईनला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली असुन गुन्हयाचा पुढील तपास चालु आहे.

## पिंपरी चिंचवडमधील बेपत्ता झालेल्या वकिलाची

गेले होते. परंतु वाकड पोलिसांनी तक्रार नोंदवून घेण्यासाठी टाळाटाळ केल्याचा आरोप कुटुंबियांनी केला. अखेर रात्री उशिरा वकील शिवशंकर शिंदे बेपत्ता झाल्याची तक्रार पोलिसांनी नोंदवून घेतली. पोलिसांनी तपास देखील सुरु केला. मात्र तपास सुरु झाल्यानंतर काही तास उलटले नाहीत तोपर्यंत शिवशंकर शिंदे यांचा अर्धवट जळलेला मृतदेह महाराष्ट्र तेलंगणा सीमेवरील मदनुर इथे आढळला आहे. मृतदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत सापडला मृतदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत आढळल्याने त्यांची हत्या झाली असावी असा संशय वाकड पोलिसांनी व्यक्त केला. त्यात नांदेडमधील पोलिसांनी शिंदे यांच्या नातेवाईकांना ताब्यात घेतलं आहे. त्यांनीच पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह जाळण्याचा प्रयत्न केला, परंतु तो अर्धवटच जळाला. आता या आरोपींना ताब्यात घेतल्यानंतरच वकील शिवशंकर शिंदे यांच्या मृत्यूचं खरं कारण समोर येईल. वाकड पोलीस अधिक तपास करत आहेत. पुण्यात गुन्ह्यांच्या घटनांमध्ये वाढ सध्या पुण्यात क्षुल्लक कारणावरुन होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. रोज नवे गुन्हे समोर येत आहेत. क्षुल्लक कारणावरुन भांडणं होतात. त्याच्या रागातून खून आणि हत्या करण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्याबरोबरच बलात्कार, सायबर क्राईम आणि लैंगिक छळांच्या घटनेत देखील वाढ होत आहे. पोलिसांनाही तक्रारी देऊन कोणताही बंदोबस्त केला जात नसल्याचं चित्र आहे. पोलीस या प्रकरणाचं गांभीर्य कधी ओळखणार?, असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे.

## धारावी पुनर्विकासातून नेचर पार्क

जवळचा आहे. नेचर पार्कचा परिसर पुनर्विकासातून वगळण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. मात्र हा परिसर पुनर्विकासासाठी संपादित केला जाऊ शकतो, अशी तरतुद करण्यात आली आहे. या छुप्या तरतुदीमुळे नेचर पार्कची ३७ एकरची जागा धारावी पुनर्विकासासाठी संपादित केली जाईल. हे संपादन बेकायदा असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला होता. माहिम नेचर पार्क हे संरक्षित वन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे या भूखंडाच्या संरक्षणाची जबाबदारी वन व महसुल विभागाची आहे. भूखंडाचे संरक्षण करण्याऐवजी या भूखंडावर पुनर्विकास केला जाणार आहे. त्यामुळे न्यायालयानेच आता हा भूखंड पुनर्विकासातून वगळ्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. या याचिकेची दखल घेत न्यायालयाने याचे प्रत्यूत्तर सादर करण्याचे आदेश राज्य शासनाला दिले होते. त्यानुसार राज्य शासनाने वरील माहिती न्यायालयात दिली. त्याची नोंद करुन घेत न्यायालयाने ही याचिका निकाली काढली.

## डोंबिवलीत ड्रंक आणि ड्राईव्ह

स्वागत मोठ्या उत्साहात झाले आहे. ड्रंक आणि ड्राईव्ह करणाऱ्या १८ जणांवर डोंबिवली वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे. ३१ डिसेंबर शनिवारी होता असला तरी शुक्रवार पासूनच सेलिब्रेशन सुरु होणार आहे, याची दक्षता घेवून पोलीस विभागामार्फत ३० डिसेंबरपासूनच ठिकठीकाणी नाकाबंदी करण्यात आली होती. त्याचप्रमाणे या सेलिब्रेशन काळात ध्वनी प्रदूषण ,महिलांची छेडछाड, चेन स्नेचींग, मोबाईल स्नेचींग तसेच शरीरा विरूध्दचे गुन्हे करणाऱ्यांवर देखील पोलीस लक्ष ठेवून होते. सेलिब्रेशन ठिकाणी, मॉल्स, ऑर्केस्ट्रा बार, लेडीज सर्विस बार, हॉटेल्स आदी गर्दीच्या ठिकाणी बीट मार्शल व स्वतंत्र पोलीस पथके गस्त घालत होती. ३१ डिसेंबर रोजी दारू पिवून गाडी चालवू नये, अशा सक्त सूचना पोलिसांनी सर्वांनाच जाहीरपणे दिल्या होत्या. ड्रंक आणि ड्राईव्ह करणाऱ्यांची ब्रेथ ॲनालायझरद्वारे तपासणी देखील करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते.

## औरंगाबाद हादरलं! एकाच दिवसांत

आहे. औरंगाबाद-अहमदनगर महामार्गावरील पेंढापूर फाट्याजवळील ढोरेगाव शिवारात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. या परिसरातील एका ऊसाच्या शेतात पाणी भरण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याला हा मृतदेह दिसून आला. त्यामुळे या घटनेची माहिती गंगापूर पोलिसांना देण्यात आली. तर माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. तर पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार मृत व्यक्तीचे नाव सुनील प्रकाश जमदाडे आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून, पुढील तपास सुरु आहे. तिसरा मृतदेह वाळूज महानगरात आढळला... तिसरी घटना औरंगाबाद वाळूज महानगरमध्ये समोर आली आहे. वाळूज परिसरातील गरवारे कंपनीच्या गोडाऊन जवळ अंदाजे एका 32 वर्षाच्या व्यक्तीचा मृतदेह आढळून आलाय. या मृतदेहाची अजून ओळख पटलेली नाही. तर अनोळखी मृतदेह आढळून आल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत, पाहणी केली आहे.

## फक्त शंभर रुपए न दिल्याने टोळक्याने महाविद्यालयीन तरुणाचा हात मनगटापासून कापला




पुणे : मद्यधुंद अवस्थेतील टोळक्याला शंभर रुपये न दिल्याने एका महाविद्यालयीन युवकावर कोयत्याने वार करण्यात आल्याची घटना पाषाण भागात मध्यरात्री घडली. टोळक्याने केलेल्या हल्ल्यात तरुणाचा पंजा तुटला असून या प्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. या प्रकरणी दोन अल्पवयीन मुलांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आशुतोष अर्जुन माने (२४, रा. दुर्वांकुर सोसायटी, पंचवटी, पाषाण) याने चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपींनी केलेल्या हल्ल्यात मानेचा मित्र पंकज अनंत तांबोळी (वय २५, रा. पाषाण ) याचा डावा हात मनगटापासून कापला गेला आहे. या प्रकरणी प्रणव काशीनाथ वाघमारे (वय १८, रा. शिक्षक कॉलनी, सूस रस्ता, पाषाण) आणि गौरव गौतम मानवतकर (वय २०, रा. तोंडेचाळ, सुतारवाडी, पाषाण) यांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्या बरोबर असलेल्या दोन अल्पवयीन मुलांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पंकज तांबोळी आणि त्याचे मित्र पाषाण परिसरात राहायला आहेत. पंकज एका शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत आहे. खाणावळ बंद असल्याने पंकज आणि त्याचे मित्र मध्यरात्री पाषाण परिसरातील साई चौकात जेवण करायला गेले. मध्यरात्री एकच्या सुमारास आरोपीनी त्याच्याकडे शंभर रुपयांची मागणी केली. पंकजने आरोपींना पैसे देण्यास नकार दिल्यानंतर त्याच्यावर हल्ला करण्यात आला. त्यामध्ये त्याचा हाताचा पंजा कापला गेला. या घटनेची माहिती मिळताच चतु:शृंगी पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंकजला तातडीने रुग्णालयात दाखल केले. चतु:शृंगी पोलिसांकडून पसार अल्पवयीन मुलांचा शोध घेण्यात येत आहे.

## बॉम्बस्फोट घडवणं तुमचं अधिकृत काम नव्हतं, कर्नल पुरोहितला सुनावत मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली याचिका



मुंबई उच्च न्यायालयाने २००८ मधील मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील मुख्य आरोपी लेफ्टनंट कर्नल प्रसाद श्रीकांत पुरोहित याची निर्दोष मुक्त करण्याची मागणी करणारी याचिका फेटाळली आहे. या बॉम्बस्फोटात सहा नागरिकांचा मृत्यू झाला होता, तर १०१ लोक जखमी झाले होते. विशेष म्हणजे सैन्य अधिकारी असल्याचं म्हणत निर्दोष मुक्त करण्याची मागणी करणाऱ्या पुरोहितला कोर्टाने "बॉम्बस्फोट घडवणं तुमचं अधिकृत काम नव्हतं" असं म्हणत सुनावलं आहे. न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि न्यायमूर्ती प्रकाश नाईक यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी आरोपी कर्नल पुरोहितने हा खटला चालवण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता (क्रिमिनल प्रोसिजर कोड) कलम १९७(२) नुसार भारतीय सैन्याकडून परवानगी घेणं आवश्यक असल्याचं आणि या खटल्यात तशी परवानगी घेतली नसल्याचा युक्तिवाद केला. "बॉम्बस्फोट घडवणं कर्तव्याचा भाग नव्हता" आरोपी कर्नल पुरोहितने त्याच्यावर खटला चालवण्यासाठी भारतीय सैन्याची परवानगी आवश्यक असल्याचा दावा केला. मात्र, एनआयएने पुरोहितचा हा दावा फेटाळला. अशी परवानगी केवळ कर्तव्यावर असताना झालेल्या गोष्टींबाबत लागते. मालेगाव बॉम्बस्फोट घडवणं हा पुरोहितच्या कर्तव्याचा भाग नव्हता, असं एनआयएने म्हटलं. नेमकं प्रकरण काय? कर्नल पुरोहितने २००७ मध्ये अभिनव भारत नावाची संघटना सुरू केली होती. त्या संघटनेला भारतीय संविधान मान्य नव्हतं आणि त्यांचा उद्देश भारताला हिंदू राष्ट्र करण्याचा होता,

असा आरोप आहे. मुस्लीम धर्मीयांसाठी पवित्र मानल्या जाणाऱ्या रमजानच्या महिन्यात २००८ मध्ये मोटारसायकलचा वापर करून बॉम्बस्फोट घडवला गेला. ही गाडी प्रज्ञा सिंह ठाकूरच्या नावावर होती. या बॉम्बस्फोटात सहा नागरिकांचा मृत्यू झाला होता, तर १०१ लोक जखमी झाले होते. मालेगाव बॉम्बस्फोटप्रकरणी कर्नल पुरोहित, भाजपा खासदार प्रज्ञा सिंह ठाकूर आणि इतर पाच जणांना २००८ मध्ये अटक झाली होती. यानंतर २०१७ मध्ये म्हणजेच अटकेनंतर नऊ वर्षांनी कर्नल पुरोहितला सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला.

## घाटकोपर स्थानकात प्रवाशांच्या प्रचंड गर्दीमुळे चेंगराचेंगरीचा धोका



मध्य रेल्वेच्या घाटकोपर स्थानकातील मधल्या मोठया पादचारी पुलावर सकाळी आणि सायंकाळी होणाऱ्या प्रवाशांच्या गर्दीमुळे चेंगराचेंगरीचा धोका निर्माण झाला आहे. सोमवारी कामाच्या पहिल्याच दिवशी सकाळी मोठया गर्दीला प्रवाशांना सामोरे जावे लागले. घाटकोपर मेट्रो स्थानकाकडे जाण्यासाठी रेल्वे प्रवाशांची गर्दी होत असून या गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि नियोजनासाठी मध्य रेल्वेकडून, किंवा मेट्रो प्रशासनानेही ठोस निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे अपघाताचा धोकाही संभवतो. घाटकोपर स्थानकातून दररा ेजे सुमारे ३ लाख ८७ हजार प्रवाशांची ये-जा असते. दर दिवशी तिकिट खिडकीवरुन पावणे दोन लाखाहून अधिक तिकिटांची विक्री हा ेते. घाटका ेपर स्थानक मध्य रेल्वेवरील महत्वाचे स्थानक आहे. या स्थानकात अप आणि डाउन दा ेन्ही मार्गावरील जलद आणि धिम्या ला ेकेल थांबतात. पूर्व आणि पश्चिम उपनगराला जोडणाऱ्या मेट्रो रेल्वेमुळे प्रवाशांचा वेळ वाचत असला तरी त्यामुळे मध्य रेल्वेच्या घाटकोपर स्थानकात प्रचंड गर्दी होत आहे. त्याची दखल माजी रेल्वेमंत्री पीयूष गोयल यांनीही घेतली होती. गोयल यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना कोंडी दूर करण्यासाठी आराखडा तयार करण्याचे आदेश दिले होते. एमआरव्हिसीकडून त्यावर काम सूरु असून उन्नत मार्ग, पादचारी पूल यासह अन्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामुळे स्थानकात गर्दीचे विभाजन होऊ शकेल. तोपर्यंत या स्थानकातील मोठया पादचारी पुलावर सकाळी आणि सायंकाळी प्रवाशांची गर्दी होत असून अपघाताचा धोका संभवत आहे. सोमवारीही चेंगराचेंगरी होईल अशाच गर्दीला प्रवाशांना सामोरे जावे लागले. मोठा पादचारी पूल घाटकोपर रेल्वे स्थानकातील सर्व फलाटांना जोडण्यात आला आहे. घाटकोपरच्या मेट्रो स्थानकालाही तो जोडण्यात आला आहे. त्यामुळे घाटकोपर रेल्वे स्थानकात उतरून अनेकजण मेट्रोने अंधेरी रेल्वे स्थानक, वर्सोवा दिशेने जातात. वर्सोवा, अंधेरी येथून पुन्हा मेट्रोने घाटकोपर रेल्वे स्थानक गाठून मध्य रेल्वेने प्रवासी प्रवास करतात. परंतु सायंकाळच्या तुलनेत सकाळी आठनंतर घाटकोपर रेल्वे स्थानकाच्या मोठया पादचारी पुलावर मेट्रोकडे जाण्यासाठी प्रवाशांची प्रचंड गर्दी होते. मेट्रोच्या तिकीट खिडक्यांसमोर रांगा लागतात. या रांगा अक्षरशः रेल्वेच्या मोठया पादचारी पुलावर लांबपर्यंत जातात. त्याचवेळी प्रवाशांची तपासणीही मेट्रो प्रशासनाकडून होत असल्याने त्या प्रवाशांच्या रांगाही पादचारी पुलावर येतात.

## नागपुरात चार दिवसांत दोन खून; जुन्या वादातून युवकाला भर रस्त्यात संपवले




उपराजधानीत नव्या वर्षाची सुरुवात खुनाच्या घटनेने झाली आहे. पाचपावलीच्या वैशालीनगर सिमेंट रोडवर रविवारी (1 जानेवारी) दिवसाढवळया एका युवकाचा खून करण्यात आल्यामुळे पोलिसात खळबळ उडाली आहे. गेल्या चार दिवसांत शहरात दोन खुनाच्या घटना घडल्याने नागरिकांमध्येही दहशतीचे वातावरण आहे. राजेश विनोद मेश्राम (वय. 25 वर्षे, रा. समतानगर) असे मृत युवकाचे नाव आहे. तर मनोज नारायण गुप्ता (वय 30 वर्षे, कपिलनगर), शुभम ऊर्फ दादू हिरामण डोंगरे (वय 30 वर्षे, संतानगर), विपिन ऊर्फ जॅकी रामपाल विश्वकर्मा (वय 27 वर्षे, बाबादीपनगर), पीयुष भैसारे (वय 22 वर्षे, रा. वैशालीनगर) अशी अटक झालेल्या आरोपींची नावे असून इमरान वहिद मलिक (ताजनगर) हा आरोपी अद्यापही फरार असल्याची माहिती आहे. दरम्यान राजेशही जीव वाचवण्यासाठी जवळच्या एका घराच्या गच्चीवर गेला. हे पाहून हल्लेखोर पळून गेले. नागरिकांनी या घटनेची पाचपावली पोलिसांना सूचना दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून जखमी राजेशला रुग्णालयात पोहोचवले. त्यावेळी त्याचा श्वास सुरु होता. रुग्णालयात पोहोचल्यानंतर त्याचा जीव गेला. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यात आरोपी आणि त्यांची कार दिसली. त्यावरुन पोलिसांनी शोध घेत आरोपींना अटक केली. तसेच फरार आरोपीचा पोलिसांकडून शोध सुरु आहे.

'तू कल मुझे ऐसा क्यू बोला' म्हणत केले वार मनोज आणि त्याचे साथीदार शस्त्रासह येत असल्याचे दिसताच, राजेश पळायला लागला. यावेळी त्यांनी त्याचा पाठलाग करत पकडले. 'तू कल मुझे ऐसा क्यों बोला' असे म्हणत, त्याच्यावर तलवारीने सपासप वार केले. राजेश आपला जीव वाचवण्यासाठी काही अंतरावर धावत गेला. पण मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने राजेशचा अखेर मृत्यू झाला.

चहाटपरी बंद पाडल्यापासून सुरु होता वाद राजेश वर्षभरापूर्वी पाण्याच्या कॅनची विक्री करण्याचे काम करायचा. त्यापूर्वी त्याने छावणी परिसरात चहाची टपरी टाकली होती. मात्र, मनोज आणि त्याचे मित्र त्याला त्रास द्यायचे. त्यातून त्याची चहाटपरीही बंद पाडली होती. त्यामुळे त्यांच्यात सातत्याने वाद व्हायचे. कालही त्यांच्यात वाद झाला होता. त्यातून राजेशने त्यांना बघून घेईल, अशी धमकी दिली होती. त्याचाच राग मनात धरुन पाचही जणांनी त्याचा गेम केल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांच्या भूमिकेबद्दल चर्चांना उधाण पाचपावली ठाण्याच्या परिसरात 25 डिसेंबरला शंकर कोत्तलवारचा खून करण्यात आला होता. त्याच्या चार दिवसानंतर दुसरी घटना घडली. पाचपावलीतील पोलिस धान्य माफिया सोनू, टेकाचा सट्टेबाज सलमान आणि सुपारी गुटख्याची माहिती घेण्यात व्यस्त आहेत. दोन महिन्यांपूर्वी डीबी पथकाचे मुख्य आणि त्यांचे कर्मचारी गुटखा-तंबाखूवर कारवाई करत होते. परंतु गुन्हेगारी रोखण्यात ते प्राधान्य देत नव्हते. अचानक डीबी पथकाच्या हृदय परिवर्तनामुळे वरिष्ठ अधिकारीही चिंतेत असल्याची चर्चा पोलीस वर्तुळात आहे. कोत्तलवारच्या खुनातही सुरुवातीला एक आरोपी आणि परांत उडवण्यावरुन वाद झाल्याचे सांगण्यात आले होते. त्यानंतर पाच आरोपींना अटक करुन वैमनस्यातून खून झाल्याचे सांगण्यात आले.

## वकिलाकडून पोलीस अधिकाऱ्याला चावीने मारहाण; पुण्यातील धक्कादायक प्रकार



पुण्यातील वकिलाने सहाय्यक पोलीस निरीक्षकाला मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पुण्यातील मार्केट यार्ड परिसरात ही घटना घडली आहे. वकिलाने पोलीसाच्या अंगावर धावून जाऊन मुठीतील चावीने मारहाण केली आहे. यात पोलीस जखमी झाले आहेत. प्रतीक अंकुश तावरे असं या वकिलाचं नाव आहे. मार्केट यार्ड पोलिसांनी प्रतीक अंकुश तावरे या 35 वर्षीय वकिलाला अटक केली आहे. याबाबत सहायक पोलीस निरीक्षक मदन कांबळे यांनी मार्केटयार्ड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यावरुन वकिलावर कारवाई करण्यात आली आहे. 29 डिसेंबर रोजी रात्री साडे अकरा वाजता घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्केट यार्ड परिसरात ही घटना घडली आहे. बुराणी कॉलनीत भांडणे सुरु असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावेळी पोलीस निरीक्षक मदन कांबळे हे रात्री त्या ठिकाणी गेले होते. प्रतीक तावरे हे त्याच्या घराशेजारी राहणारे हर्षल लाहोटे यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करीत होते. यावेळी पोलिसांनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र यावेळी वकिलाने दादागिरी केली. मी वकील आहे, असं सांगत पोलिसांना बाजूला सारलं आणि त्यांच्या अंगावर धावून जात हल्ला केला. यावेळी त्याच्या हातात गाडीची चावी होती. त्याच चावीने पोलीस निरीक्षकाच्या डोक्यावर हल्ला केला आहे. या प्रकरणी वकिलाला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनाच मारहाण होत असल्याने त्यांच्या सुरक्षेच्या प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिसही असुरक्षित... पुण्यात पोलिसांना मारहाणीच्या घटनेत सातत्याने वाढ होत आहेत.काही दिवसांपूर्वी पोलीस कर्मचाऱ्याच्या डोक्यात दगड घातल्याचा प्रकार उघडकीस आला होता. सोलापूर महामार्गावर लोणी टोल नाक्याजवळ हा प्रकार घडला होता. या मारहाणीत पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले होते.

## 'विरुष्का'ने शेअर केला फोटो


**दुबई :** सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी भारतीय क्रिकेट स्टारनी विविध देश निवडले आहेत.



त्यात भारताचा माजी कर्णधार विराट कोहलीने पत्नी अनुष्का शर्मासोबत दुबई गाठत नववर्षाचे सेलिब्रेशन केले. विराट कोहलीने पत्नी अनुष्का शर्मासोबतचा एक फोटो शेअर करत नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. तर अनुष्काने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर विराटसोबतचा एक फोटोही शेअर केला आहे. विराटसोबत त्याची भावंडेही दुबईत आहेत. कोहली ३ जानेवारीपासून श्रीलंकेविरुद्ध सुरू होणाऱ्या टी-२० मालिकेचा भाग नाही. ३ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत तो संघाचा भाग आहे.

## गांगुली यांचा फलंदाजीचा व्हीडिओ ट्वीट

**नवी दिल्ली :** बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली यांनी फलंदाजी करतानाचा एक व्हीडिओ ट्वीट केला आहे. सौरव गांगुली यांनी ५ सेकंदाचा हा व्हीडिओ नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी शेअर केला आहे. सौरव गांगुली यांनी शेअर केलेल्या व्हीडिओत तो फलंदाजी



करताना दिसत आहे. ज्यामध्ये तो मोठ-मोठे फटके मारताना दिसत आहे. या व्हीडिओच्या शेवटी कमिंग सून असे लिहिले आहे. हा व्हीडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. व्हीडिओ पाहून लोक असा अंदाज लावत आहेत की, सौरव गांगुली यांचा बायोपिक येणार आहे. कमिंग सून का लिहिलंय हे दादांनी स्पष्ट केलेले नाही. टीम इंडियाच्या माजी कर्णधारावर हिंदीत बायोपिक बनणार असल्याच्या अनेक बातम्या याआधी समोर आल्या आहेत.

## ...आता युवा खेळाडूंची कसरत

### राष्ट्रीय संघात स्थान मिळवण्यासाठी पुरेसे देशांतर्गत हंगाम खेळावे लागणार

राष्ट्रीय क्रिकेट संघात स्थान मिळवणे हे प्रत्येक युवा खेळाडूचे स्वप्न असते. त्यासाठी तो प्रयत्नशीलही असतो. पण आता राष्ट्रीय संघात स्थान मिळवणे युवा खेळाडूंसाठी अधिक अवघड झाले आहे. उभरत्या खेळाडूंना टीम इंडियामध्ये निवडीला पात्र होण्यासाठी पुरेसे देशांतर्गत हंगाम खेळावे लागतील, असे बीसीसीआयतर्फे सांगण्यात आले. रविवारी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची मुंबईत आढावा बैठक झाली. या बैठकीत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली.

या बैठकीला बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी, सचिव जय शाह, भारतीय कर्णधार रोहित शर्मा, टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड, राष्ट्रीय क्रिकेट अकादमी व्हीव्हीएस लक्ष्मण आणि पुरुष निवड समितीचे अध्यक्ष चेतन शर्मा उपस्थित होते.

बोर्डाने एका निवेदनात म्हटले आहे की, यापुढे युवा खेळाडूंना राष्ट्रीय संघात स्थान मिळवण्यासाठी पुरेसे देशांतर्गत हंगाम खेळावे लागतील. भारतात रणजी ट्रॉफी, सय्यद मुश्ताक अली यांसारख्या मोठ्या देशांतर्गत स्पर्धा आहेत. बीसीसीआयने सांगितले की, उभरत्या खेळाडूंना टीम इंडियामध्ये निवडीसाठी पात्र होण्यासाठी पुरेसे देशांतर्गत हंगाम खेळावे लागतील. मात्र, शेवटचा खेळाडू खेळण्यासाठी किती सामने आवश्यक असतील हे सांगण्यात आलेले नाही.




### कामाचा ताण व्यवस्थापनासाठी योजना

बीसीसीआयने अधिकृतपणे केवळ दुखापती आणि कामाचा ताण व्यवस्थापनासाठी योजना उघड केल्या आहेत. यापुढे युवा खेळाडूंना टीम इंडियात स्थान मिळवण्यासाठी अधिक मेहनत करावी लागणार आहे. वास्तविक बीसीसीआयच्या या बैठकीत टीम इंडियातील निवडीबाबत माहिती देण्यात आली आहे. बैठकीनंतर बीसीसीआयने अधिकृत अपडेट दिले आहे. बोर्डाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने रविवारी मुंबईत टीम इंडियाची आढावा बैठक बोलावली.

### खेळाडूंना करावी लागणार डेक्सा टेस्ट

टीम इंडियाच्या कामगिरीबद्दल बीसीसीआयकडून बैठक घेण्यात आली. त्यामध्ये अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. त्यानुसार आता भारतीय संघामध्ये निवड होण्यासाठी यो टेस्ट व्यतिरिक्त डेक्सा टेस्ट करावी लागणार आहे. ड्युएल एनर्जी एक्स-रे असे या टेस्टचे नाव असून त्या टेस्टशिवाय भारतीय आंतरराष्ट्रीय सामन्यासाठी होणाऱ्या टीममध्ये खेळाडूंची निवड होणार नाही, असा नियम करण्यात आला आहे.

## सहा वर्षांत पहिल्यांदाच असे घडले

## भारताने गमावले कसोटीचे अव्वल स्थान



कसोटी क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर राहत टीम इंडियाने २०२२ या वर्षाला निरोप दिला. आतापर्यंत सलग सहा वर्षे कसोटी क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर राहत सरत्या वर्षांना निरोप दिली होता; परंतु २०२२ वर्षाचा निरोप घेताना सहा वर्षांत पहिल्यांदाच टीम इंडियाला अव्वल स्थान राखता आले नाही. इंग्लंड संघाने यावर्षी कसोटी क्रमवारीत पहिल्या स्थानावर राहून वर्षाचा शेवट केला आहे. ज्यामुळे भारत दुसऱ्या स्थानावर घसरला आहे.

२०१४ मध्ये विराट कोहलीला कसोटी संघाची कमान मिळाली होती. त्याच्या नेतृत्वाखाली भारताने खेळाच्या मोठ्या फॉरमॅटमध्ये नवीन उंची गाठली. २०१६ मध्ये भारताचा संघ कसोटीत नंबर-१ बनला होता. तेव्हापासून, टीम इंडिया पहिल्या स्थानावर होती. २०२२ ला सुरुवात झाली तेव्हा भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर होता. कर्णधारपद सोडण्यापूर्वी विराटच्या नेतृत्वाखाली संघाने कसोटी मालिका १-२ अशी गमावली होती. यानंतर रोहित युग सुरू झाले.

टीम इंडियासाठी गेले वर्ष विशेष चांगले नव्हते. रोहित अँड कंपनीला टी-२० विश्वचषक आणि आशिया चषक यांसारख्या स्पर्धांमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघाने २०२२ मध्ये विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली संघाने मिळवलेला तो विशेष पराक्रमही गमावला आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्क:-9594418181 / 8424989898